# डिलाईल रोड येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा



मुंबई (बाळ पंडित): ना.म.जोशी मार्गावरील, बी.डी.डी चाळ येथील, फॅमिली वेल्फेअर एजन्सी व डाऊनटाऊन क्लब मुंबई यांच्या संयुक्त विद्यमानाने फॅमिली वेल्फेअर एजन्सीच्या कार्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा झाला.

तद प्रसंगी एनरविलकल्बच्या अध्यक्षा-आसिता दावडा, सचिव-नीता गोकानी, उपाध्यक्ष-दक्षा मुरलीधर व फॅमिली वेल्फेअर एजन्सीच्या प्रमुख-अल्फा देसाई ह्या उपस्थित होत्या. जागतिक महिला दिना निमित्त ज्येष्ठ महिलांसाठी, प्रश्न मंजुषा, स्मरण शक्ती, चर्चासत्र,आदीचे आयोजन केले होते.

ज्येष्ठ महिलाचे आर्थिक, सामाजिक प्रश्न, परिस्थिती व त्यांच्या जबाबदाऱ्या या विषयावर अरुणा पेंडुरकर, कुंदना पंडित, स्वाती परब, लीला सपकाळ, सुहासिनी शेलार, इरावती पाटील, स्नेहप्रभा मन्नुर , जयश्री दळवी, यांनी आपली मते व्यक्त केली. सुनंदा नेवरेकर यांनी आपल्या विनोदी शैलीत आपले विचार मांडून सर्व महिलांची मने जिंकली. प्रश्न मंजुषा मध्ये लीला सपकाळ, स्वाती परब, सुहासिनी महाडिक, कुंदना पंडित, व इरावती पाटील ह्या अंतिम विजयी झाल्या. स्मरणशक्ती स्पर्धेत समिधा सुर्वे ह्याना सर्वोत्कृष्ट स्मरणशक्तीचा मान मिळाला तर संध्या बनकर,जयश्री सातगरे, लीला सपकाळ, वनिता दळी यांना विशेष पारितोषिके देण्यात आली.व उपस्थित सर्व महिलांना भेटवस्तू देण्यात आल्या.

उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन करून सर्व महिलांना शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचलन क्रांती भिलारे व आभार स्वांती परब यांनी मानले.